**रे. दरखास्त क्र. ५/२०२१ मधील नि.क्र. ३७ खालील आदेश.**
**सखाराम गायकवाड -विरुध्द- आबू गायकवाड व इतर**
**आदेश पारित दिनांक २१.०२.२०२३**

---

दरखास्तरदार (डी.एच) क्र. ५ यांनी प्रस्तूतचा अर्ज मयत जे.डी. क्र. ३(अ) संपत लक्ष्मण कांबळे यांचे वारस कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर नोंद होणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जासहित निलेश नथू गायकवाड यांचे निशाणी क्र. ३८ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे.

०२. प्रस्तूत अर्जामध्ये असे कथन करणेत आले आहे की, सदर दरखास्त चालू असताना या प्रकरणातील जे.डी. क्र. ३(अ) संपत लक्ष्मण कांबळे हे दिनांक १७.०५.२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयत जे.डी. क्र. ३(अ) संपत यांना वारस क्र. ३-अ-१ ते ३-अ-५ असे एकूण पाच कायदेशीर वारस आहे. उपरोक्त नमूद वारसांची नोंद अभिलेखावर व्हावी अशी विनंती दरखास्तदार यांनी केली आहे. तसेच, प्रस्तूतची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे मूळ सरनाम्यामध्ये कोणताही बदल होत नाही. करिता मयत जे.डी. क्र. ३(अ) संपत लक्ष्मण कांबळे यांच्या वारसांच्या नावांची नोंद अभिलेखावर व्हावी, अशी विनंती करणेत आली आहे.

०३. प्रस्तूत जे.डी. क्र. ६, ८ व ९ यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करून सदरचा अर्ज मंजूर करण्यास हरकत नाही असे कथन केले आहे.

०४. दरखास्तरदार यांचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जे.डी. क्र. ३(अ) संपत लक्ष्मण कांबळे हे दिनांक १७.०५.२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयत जे.डी. क्र. ३(अ) संपत यांना वारस क्र. ३-अ-१ ते ३-अ-५ असे एकूण पाच कायदेशीर वारस आहे. सदर दरखास्तचा गुणदोषावर निकाल देणेकामी मयत जे.डी. क्र. ३(अ) संपत यांचे कायदेशीर वारस सदर दरखास्तमध्ये सामील करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

१. दरखास्तरदार क्र. ५ यांचा निशाणी क्र. ३७ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. दरखास्तरदार (डी.एच.) यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

(अ. क. दामटे)

दिनांकः- २१.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.